**महाराष्ट्र शासन**
**महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ**
**नवीन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११ ००१**

**ई-मेलआयडी**-regulatoryboard2019@gmail.com दुरध्वनी क्रमांक-०२०- २६१२९३२१/२६१२२८४६

---

जा.क्र.पतसंस्था/सआ-५/ नियामक मंडळ/प्र.११-१ अ/१९ /१२१६ दिनांक :- १०/०५/२०१९

प्रति,

१) सर्व, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,
२) सर्व, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,

विषय :- महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ बैठक
दिनांक २/५/२०१९ रोजीचे सभेतील ठरावाचे अंमलबजावणीबाबत...

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम,१९६० मध्ये बिगर कृषी सहकारी पतसंस्थांसाठी प्रकरण ११-१ अ समाविष्ट झाले असून त्याची अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र दि.७/९/२०१७ ने प्रसिध्द करण्यात आली आहे. सदरचे प्रकरण दि.२२/२/२०१९ चे शासन अधिसूचनेव्दारे अंमलात आले आहे. याबाबत या कार्यालयाचे दि.१५/३/२०१९ रोजीचे पत्राव्दारे आपणांस कळविलेले आहे.

त्याअनुषंगाने महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळाची बैठक मंडळाचे अध्यक्ष तथा मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २/५/२०१९ रोजी या कार्यालयामध्ये पार पडली.

सदर सभेमध्ये मंजूर करण्यात आलेल्या ठरावाबाबत आपले कार्यक्षेत्रातील नागरी / ग्रामिण बिगर कृषि सहकारी पतसंस्था व पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्था यांना खालील निर्णयाबाबत कळविण्याची दक्षता घ्यावी. तसेच सदरहू निर्णयाचे अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आपले कार्यक्षेत्रातील संस्थांचा आढावा घेण्यात यावा. बिगर कृषि सहकारी पत संस्थेस नियामक मंडळाने केलेले विनियम व घालून दिलेली मार्गदर्शक तत्वे यांचे अनुपालन करणे बंधनकारक आहे याची सर्व संस्थांना माहिती देण्यात यावी.

**१.** कलम १४४-९ अ अन्वये बिगर कृषी पतसंस्थेने ठेवावयाचे रोख राखीव निधीचे प्रमाण ठरविणे.

संस्थेकडे असलेल्या मागील तिमाही अखेरच्या एकूण ठेवीच्या २% पेक्षा कमी नसेल इतकी रक्कम लगतचे चालू तिमाहीसाठी दैनंदिन पध्दतीवर रोख तरलता म्हणून ठेवण्यात यावी. त्यामध्ये खालील बाबींचा समावेश करण्यात यावा.

१. संस्थेकडे रोखीचे स्वरुपात असलेली रक्कम (नियम १०७ मध्ये नमूद मर्यादेचे अधिन)
२. संस्थेच्या निरनिराळया बँकेतील बचत खात्यातील एकूण रक्कम.
३. संस्थेच्या निरनिराळया बँकेतील चालू खात्यामधील एकूण रक्कम.
४. १५ दिवसांपेक्षा जास्त नाही एवढया मुदतीच्या अल्प मुदत ठेवींची रक्कम.
५. धारण केलेल्या निर्धारित तरलता निधीतून कलम १४४-१० अ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक प्रमाणात केलेल्या गुंतवणूकीवर काढलेले अधिकर्ष.

सदर निधीबाबत संस्थेने दैनंदिन पध्दतीवर आवश्यक त्या नोंदी ठेवावयाच्या असून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्या दररोज प्रमाणित करणे आवश्यक आहे.

सदरचा निर्णय दि.१ जुलै २०१९ पासून लागू करण्यात येत आहे. दि.३० जून २०१९ रोजी असणा-या एकूण ठेवींपैकी २% ठेवी रोखता निधी म्हणून दिनांक १ जुलै २०१९ पासून दैनंदिन पध्दतीवर ठेवण्यात यावा.

Scanned by CamScanner

उपरोक्तप्रमाणे मुख्य शाखा आणि प्रत्येक शाखेमधील अशी रक्कम दर्शविणारे खालील नमुन्यातील विवरणपत्र प्रत्येक तिमाहीच्या अखेरच्या १५ व्या दिवशी किंवा तत्पूर्वी नियामक मंडळास सादर करणे बंधनकारक आहे. विहित प्रमाणामध्ये रोखता निधी संस्थेने दैनंदिन पध्दतीवर न ठेवल्यास कलम १४४-३१ अ अन्वये दंड करण्याची तरतूद आहे.

**रोखता निधी विवरणपत्र**

संस्थेचे नांव व पत्ता :-
अहवालाचा कालावधी :-
अहवाल सादर केल्याचा दिनांक :-

| अ.क्र. | तपशिल | रक्कम (रुपये लाखात) |
|---|---|---|
| १ | संस्थेकडे रोखीचे स्वरुपात असलेली रक्कम | |
| २ | संस्थेच्या निरनिराळया बँकेतील बचत खात्यातील रक्कम. | |
| ३ | संस्थेच्या निरनिराळया बँकेतील चालू खात्यामधील रक्कम | |
| ४ | १५ दिवसांपेक्षा जास्त नाही एवढया मुदतीच्या अल्प मुदत ठेवीची रक्कम. | |
| ५ | धारण केलेल्या निर्धारित तरलता निधीतून कलम १४४-१० अ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपेक्षा (२५% तरलता निधीच्या) अधिक प्रमाणात केलेल्या गुंतवणूकीवर काढलेले अधिकर्ष. | |
| | एकूण | |

मागील तिमाही अखेर एकूण ठेवींची रक्कम =
चालू तिमाही मधील दैनंदिन पध्दतीप्रमाणे येणारी सरासरी रोख निधीची रक्कम =
एकूण ठेवीशी रोखता निधीचे प्रमाण =

**टिप १ :-** मागील तिमाही अखेर असणा-या एकूण ठेवीच्या २% प्रमाणे येणारी रक्कम रोख निधी म्हणून चालू तिमाहीमध्ये दैनंदिन पध्दतीवर ठेवावयाची आहे. उपरोक्त नमूद तक्त्यामध्ये चालू तिमाही अखेर दैनंदिन पध्दतीवर ठेवलेल्या रोखतेची सरासरी रक्कम प्रत्येक मुद्या समोर नमूद करावी.

**२.** कलम १४४-१० अ अन्वये बिगर कृषी पतसंस्थेने ठेवावयाचे तरलता निधीचे प्रमाण ठरविणे.

संस्थेकडे असलेल्या मागील तिमाही अखेरच्या एकूण ठेवीच्या २५% पेक्षा कमी नसेल इतकी रक्कम लगतचे चालू तिमाहीसाठी मुदत ठेवीमध्ये दैनंदिन पध्दतीवर तरलता म्हणून ठेवण्यात येईल. तरलता निधीसाठी मुदत ठेवीमधील गुंतवणूक पुढीलप्रमाणे करता येईल.

१. राज्य सहकारी बँक.
२. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक.
३. मागील सतत तीन वर्ष लेखापरिक्षण वर्ग “अ” असणा-या तसेच रिझर्व्ह बँकेच्या अद्यावत तपासणीनुसार “ए” ग्रेड असणा-या नागरी सहकारी बँका.
४. रिझर्व्ह बँकेच्या अद्यावत तपासणीनुसार “ए” ग्रेड असणा-या संस्थेच्या मुख्यलयाच्या ठिकाणी असलेल्या राष्ट्रीयकृत तथा प्रादेशिक बँका.
५. शासनाने सर्वसाधारण अथवा विशेष आदेशाव्दारे परवानगी दिलेल्या कोणत्याही प्रकारामधील गुंतवणूक.

सदर निधीबाबत संस्थेने दैनंदिन पध्दतीवर आवश्यक त्या नोंदी ठेवावयाच्या असून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्या दररोज प्रमाणित करणे आवश्यक आहे.

सदरचा निर्णय दि.१ जुलै २०१९ पासून लागू करण्यात येत आहे. दि.३० जून २०१९ रोजी असणा-या एकूण ठेवींपैकी २५% तरलता निधी म्हणून दि.१ जुलै २०१९ पासून दैनंदिन पध्दतीवर ठेवण्यात यावा.

Scanned by CamScanner

उपरोक्तप्रमाणे एकूण ठेवीच्या २५% प्रमाणे केलेल्या गुंतवणूकी व्यतिरिक्त अतिरिक्त गुंतवणूकीवर संस्थेस कर्ज काढण्यास मुभा राहील. २५% तरलता निधीच्या गुंतवणूकीवर संस्थेस कर्ज काढता येणार नाही. तसे आढळून आल्यास संस्थेने निर्धारित तरलता राखली नाही असे समजण्यात येईल.

उपरोक्तप्रमाणे अशी रक्कम दर्शविणारे खालील नमुन्यातील विवरणपत्र प्रत्येक तिमाहीच्या अखेरच्या १५ व्या दिवशी किंवा तत्पुर्वी नियामक मंडळास सादर करणे बंधनकारक आहे. विहित प्रमाणामध्ये तरलता निधी संस्थेने दैनंदिन पध्दतीवर न ठेवल्यास कलम १४४-३१अ अन्वये दंड करण्याची तरतूद आहे.

## तरलता निधी विवरणपत्र

संस्थेचे नांव व पत्ता :-

अहवालाचा कालावधी :-

अहवाल सादर केल्याचा दिनांक :-

| अ.क्र. | तपशिल | (रक्कम रुपये लाखात) |
|---|---|---|
| १ | राज्य सहकारी बँकेतील मुदत ठेवीची रक्कम | |
| २ | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील मुदत ठेवीची रक्कम | |
| ३ | मागील सतत तीन वर्ष लेखापरिक्षण वर्ग "अ" असणा-या तसेच रिझर्व्ह बँकेच्या अद्यावत तपासणीनुसार "ए" ग्रेड असणा-या नागरी सहकारी बँकेतील मुदत ठेवीची रक्कम | |
| ४ | रिझर्व्ह बँकेच्या अद्यावत तपासणीनुसार "ए" ग्रेड असणा-या संस्थेच्या मुख्यलयाच्या ठिकाणी असलेल्या राष्ट्रीयकृत तथा प्रादेशिक बँकेतील मुदत ठेवीची रक्कम | |
| ५ | शासनाने सर्वसाधारण अथवा विशेष आदेशाव्दारे परवानगी दिलेल्या कोणत्याही प्रकारामधील गुंतवणूक | |
| | **एकूण गुंतवणूक** | |

मागील तिमाही अखेर एकूण ठेवींची रक्कम =

चालू तिमाही मधील दैनंदिन पध्दतीप्रमाणे येणारी तरलता निधी गुंतवणूकीची सरासरी रक्कम =

एकूण ठेवीशी तरलता निधीचे प्रमाण =

**टिप १:-** मागील तिमाही अखेर असणा-या एकूण ठेवीच्या २५% प्रमाणे येणारी रक्कम तरलता निधी म्हणून चालू तिमाहीमध्ये दैनंदिन पध्दतीवर ठेवावयाची आहे. उपरोक्त नमूद तक्त्यामध्ये मागील तिमाही अखेर दैनंदिन पध्दतीवर ठेवलेल्या तरलता निधी रक्कम प्रत्येक मुद्या समोर नमूद करावी.

**३.** बिगर कृषी पतसंस्थेने प्रशासकीय व आस्थापनेवर करावयाच्या खर्चाची कमाल मर्यादा ठरविणे.
बिगर कृषी पतसंस्थेचा आस्थापना व प्रशासकीय खर्च हा संस्थेच्या खेळते भांडवलाच्या २% पेक्षा अधिक असणार नाही.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम २ (३१) अनुसार खालील बाबींचा समावेश खेळते भांडवलात होतो.

१. वसुल झालेले भाग भांडवल.
२. राखीव निधी व नफा विभागणीमधून निर्माण केलेले इतर निधी.
३. संस्थेने स्विकारेल्या ठेवी.
४. संस्थेने घेतलेली कर्जे.

Scanned by CamScanner

संस्थेच्या आर्थिक वर्षाच्या नफा-तोटा पत्रकातील खर्च बाजू मधील व्याज व कायदेशीर तरतुदी यांच्या रक्कमा वजा जाता उर्वरित सर्व खर्चाचा समावेश संस्थेच्या त्या आर्थिक वर्षाच्या आस्थापना व प्रशासकीय खर्चामध्ये होईल.

(मिलिंद सोबले)
सचिव, महाराष्ट्र राज्य बिगर कृषि
सहकारी पतसंस्था नियामक मंडळ

प्रत माहितीसाठी :-

१. खाजगी सचिव, मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. मा.अपर निबंधक, सहकारी संस्था (पतसंस्था), महाराष्ट्र राज्य, पुणे.

Scanned by CamScanner